अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ०५/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ४३७ दि. १५/०४/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०५/२०१९

**श्री सुरज नथुराम लोखंडे ,**
**गल्ली न.१४,दत्त मंदिराजवळ ,**
**जनता वसाहत,पर्वती,**
**पुणे ४११००९**

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्री सुरज नथुराम लोखंडे ,गल्ली न.१४,दत्त मंदिराजवळ ,जनता वसाहत,पर्वती,पुणे ४११००९** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १२.०२.२०१९ रोजी अर्ज करून "पुणे महानगरपालिकातील मा.सहाय्यक उद्यान अधिक्षक या पदावर कार्यरत असलेले यांना विविध विभागातील देण्यात आलेले कार्यभार अतिरिक्त कार्यभार ,कार्यभाराचा कालावधी,कारभाराचा हुद्दा व यासंदर्भातील कार्यालयीन आदेश यासंदर्भातील कागदपत्रे या बाबत संपूर्ण माहिती" मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१०६३० दि. ०६.०३.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.